महा/[illegible]
17/3/2021

परिशिष्ट–ब

महाकृष्ण गोसेवा संस्था, मु. पो. ईंगतपुरी, ता. ईंगतपुरी जि. नाशिक.
(मेमोरॅण्डम ऑफ असोशिएशन)

संस्थेचे नाव :- महाकृष्ण गोसेवा संस्था, मु. पो. ईंगतपुरी, ता. ईंगतपुरी जि. नाशिक.,

संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता:-

व्दारा- श्रीमती. कृष्णादेवी महावीर शर्मा, रा. वार्ड नं.३, गांधी चौक, मु. पो. ईंगतपुरी, ता. ईंगतपुरी जि. नाशिक ४२२४०३

अर्ज क्र. ...534/21
अर्जदाराचे नाव सजन शर्मा
नक्कल सेवा शुल्क रुपये: 30/-
1/4/21

कार्यक्षेत्र :- या संस्थेचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र भर राहील.

(४) विश्वस्थ व्यवस्थेचा हेतु - केंद्र व राज्य शासनाचे कायदा, आदिसुधना, नियम, परिपत्रके, यांचे अनुषंगाणे आवश्यक परवानगी व पुर्तता केले नंतर पुढील उद्देश करण्यात येईल

१. गोशाळा सुरू करणे, तसेच पशुधन वाचविण्याचे व वाढविण्याचे प्रयत्न करणे.
२. पुरातन पशुची सेवा करणे, तसेच शाकाहाराचा प्रचार व प्रसार करणे.
३. विविध प्रकारच्या गायींचे पालन करणे व त्यांना सर्व प्रकारचे सोयी सुविधा उपलब्ध करणे.
४. देशी विदेशी गायींचे संवर्धन करून त्यांना एकत्रीत करणे, त्यांच्या पासुन निर्माण होणाऱ्या दुध, शेण, मलमुत्र यांच्या पासुन निर्माण होणारे तुप, लोणी, खवा, शेणा पासुन शेणखत तयार करूण त्यांचे प्रशिक्षण देणे.
५. संस्थेवरील विविध प्रकारच्या गायींस निवारा गृहाची योजना कार्यन्वीत करणे, संकटग्रस्त प्राण्यांसाठी रूग्णवाहीकेची सोय उपलब्ध करणे.
६. जनावरांची व गायींची होणारी कत्तल थांबवीणे व त्यासाठी प्रतिबंध करून त्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरविणे
७. जनावरांना चांगल्या प्रकारचे खाद्य उपलब्ध करणे तसेच उत्तम प्रकारचे पशुखाद्य निर्मीत करणे .
८. अनेक प्रकारचे मत्स्य पालन करून त्यांचे प्रदर्शन भरवीणे.
९. गोपालन, कुकुट पालन, शेळी, मेंढी, शहामृग, वराह, पालन पोषण व सांभाळ करणे तसेच त्याचे प्रशिक्षण देणे व प्रदर्शन भरविणे.
१०. अनेक प्रकारच्या गायी, म्हशींचे उत्तम पद्धतीने पालन पोषण करणे व राष्ट्रीय स्थरावर प्रदर्शन भरवीणे.
११. पशु, पक्षी व जनावरांसाठी असलेल्या शासन योजनांची अंमलबजावणी करणे.
१२. सामाजिक प्रचार व प्रसारासाठी प्रबोधन वर्ग चालविणे व व्याख्याने आयोजित करणे.
१३. अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरिती यांच्या निर्मुलनाचे कार्य करणे.
१४. छ.शिवाजी, स्वामी विवेकानंद, डॉ. आंबेडकर, छ.शाहु महाराज, महात्मा फुले, भगवान बुद्ध या सारख्या राष्ट्रीय पुरूषांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी करणे व कार्यक्रम राबविणे.
१५. गरीब व हातकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा साहित्य, गणवेश मोफत वाटणे व त्यांच्या कलाना प्रोत्साहन देणे.
१६. संस्थेमार्फत गरीब व दारिद्र्य रेषेखालील जनतेला वैद्यकिय मदत करणे, औषधे व वैद्यकिय सेवा विना शुल्क उपलब्ध करून देणे. आरोग्य व सामाजिक स्वच्छतेविषयी माहिती देणे, सामाजिक स्वच्छता, लसीकरण या सारखे कार्यक्रम राबविणे. भुकंप, आग, पुर या सारख्या अन्य नैसर्गिक आपत्तीत आपत्तग्रस्तांना सर्व प्रकारची मदत करणे.
१७. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपन करणे, प्रदुषणाचा प्रादुर्भा कमी करण्यासाठी कचरा व्यवस्थापनासंबधी शिबीरे आयोजीत करणे, कार्यशाळा घेणे,
१८. टाकाऊ वस्तुपासुन टिकाऊ वस्तु तयार कराण्याचे प्रशिक्षण सुरू करणे, पर्यावरण संवर्धनासाठी प्रचार प्रसार, प्रबोधन करणे.
१९. संस्थेमार्फत आरोग्य कार्यक्रम राबविणे, आरोग्य कार्यक्रम अंतर्गत येणाऱ्या सेवांची माहिती व प्रसार करून त्याचा लाभ लाभार्थींना देणे किंवा सहभागी करणे तसेच व्यसनमुक्ती पर जनजागृती अभियान राबविणे.
२०. संस्थेमार्फत सर्वांसाठी शिक्षण, आरोग्य, ध्येय ठरवुन संस्थेच्या वतीने आदीवासी मुलामुलींसाठी बाल संस्कार केंद्र, प्रौढ शिक्षण, संस्थेच्या वतीने अनाथ आश्रम, विशेषत: जे समाज बहिष्कृत व्याधी, रोगी आहेत. कृष्ठ रोगी, क्षयपिडीत, एडस् ग्रस्त अशा रोगांसाठी मानवता दृष्टीकोनातुन अनाथ आश्रम करणे.

नक्कल अर्ज मिळाल्याचा दि. 15/3
नक्कल दिल्याचा दि. 1/4/2
नक्कल तयार करणार
नक्कल सज्जत करणार

कृष्णादेवी शर्मा
अध्यक्ष

उपाध्यक्ष

9/8/2021
प्र. अधिकारी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
[illegible]

सचिव